# स्त्री मुक्ती आंदोलन संपर्क समिती

-- प्रा. डॉ. सौदामिनी राव

(मूळ इंग्रजी लेखाचे भाषांतर : लीना पाहुडेकर)

स्त्री मुक्ती आंदोलन संपर्क समिती, महाराष्ट्र (वुमेन्स लिबरेशन मुव्हमेंट कम्युनिकेशन कमिटी, महाराष्ट्र ) ही १९७९ मध्ये स्थापन झाली या संस्थेचा विस्तार मुख्यतः महाराष्ट्रापुरताच मर्यादित आहे. परंतु बेळगाव, निपाणी (कर्नाटक राज्य) येथील काही संघटनाही स्त्री मुक्ती आंदोलन संपर्क समितीच्या काही कार्यक्रमात सहभागी झाल्या आहेत. महाराष्ट्रातील बऱ्याच संघटनांचे व गटांचे संपर्क समिती हे एकजुटीचे व्यासपीठ आहे. संपर्क समिती या नावावरून एकदा चर्चाही झाली. संपर्क समिती केवळ तिच्या सभासदांमध्ये संवाद साधण्यासाठी नसून या चळवळीमध्ये एकजुटीचे व्यासपीठ म्हणून तिचा कार्यशील सहभाग आहे. तेव्हा नाव बदलावे का ? असा विचार त्यामध्ये मांडला गेला. संपर्क समिती हे नाव सर्वांनाच परिचित आहे आणि 'आंदोलन' हा शब्द कृती दर्शवतो असे लक्षात आले. त्यामुळे हे नाव बदलायची गरज भासली नाही.

## पार्श्वभूमी

१९७५ साली अखिल जागतिक महिला वर्षानिमित्त पुण्यामध्ये महिलांची परिषद झाली त्यामधून संपर्क समितीची कल्पना निर्माण झाली. या परिषदेत गृहिणी, तसेच सर्व प्रकारच्या आर्थिक थरातील स्त्रिया व विविध क्षेत्रातील नोकरी करणाऱ्या स्त्रिया आवर्जून उपस्थित होत्या. परंतु विविध संस्थांमधील स्त्रियांच्यामध्ये परस्परसंबंध प्रस्थापित करण्यासाठी संपर्क समिती स्थापना करण्याची कल्पना, मात्र त्यावेळेस प्रत्यक्षात येऊ शकली नाही.

जुलै १९७८ मध्ये सत्यम् शिवम् सुन्दरम् या राजकपूरच्या चित्रपटामध्ये कलेच्या नावाखाली चित्रपटाच्या नायिकेचे शरीरप्रदर्शन केले गेले, त्यावेळी पुण्यातील स्त्री पुरोगामी संघटनेने इतर महिला संघटनांच्या सहकार्याने निदर्शन–मोर्चा काढला होता. 'प्रथमच' मध्यमवर्गीय महिलाही स्त्रियांच्या प्रतिष्ठेच्या प्रश्नासाठी मोर्चात सहभागी झाल्या होत्या. स्त्री ही केवळ उपभोगाची वस्तू व तिच्या देहाचा व्यापार करून आर्थिक फायदा मिळविण्याची वस्तू नाही, हा दृष्टिकोन त्यामागे होता. यावर उलट सुलट बरीच चर्चा झाली वृत्तपत्रांमधून बरीच प्रसिद्धी मिळाली. या मोर्चामुळे समाजाचे महिलांच्या प्रश्नाकडे लक्ष गेले. या यशामुळे संपर्क समितीची कल्पना कदाचित आता अंमलात येऊ शकेल असे मला वाटले. सामाजिक विचार व सामाजिक मानसिकता यावर महिला संघटनांनी दखलपात्र ठसा उमटवणे आणि सरकारवर दबाव आणून महिलांकरता विशिष्ट कार्यक्रम घेणारा व कृती करण्यास सरकारला भाग पाडणे यासाठी काही समान प्रश्नांवर विविध संघटना एकत्र येऊ शकतील, अशी शक्यता वाटली. अनेक संघटना व कार्यकर्त्यांचे गट महिला प्रश्नांसाठी कार्यरत आहेत. परंतु या प्रत्येकाच्या मर्यादित शक्तीमुळे त्यांचा होणारा परिणाम नगण्य ठरत होता.

## संपर्क समितीची स्थापना

मी काही अनुभवी महिलांशी चर्चा केली (मालिनीबाई तुळपुळे, लीला भोसले, छाया दातार इ.). या चर्चेमध्ये विविध संघटनांचे दोन दिवसाचे शिबीर आयोजित करण्याची कल्पना मांडण्यात आली. स्त्रीसंघटनाकरता एकजुटीचे व्यासपीठ स्थापन करण्याची शक्यता पडताळून पहाण्याचे ठरले. अनेक संघटनांच्या सहकार्याने १० व ११ फेब्रु. १९७९ मधे सभा व कार्यक्रम आयोजित करण्याचे ठरविण्यात आले.

दहा जणांची एक समिती सभेतील निर्णय अंमलात आणण्यासाठी व प्रसिद्धीच्या कामासाठी नियुक्त केली. तसेच पत्रव्यवहार, रहाण्याची व खाण्याची सोय व प्रमुख कार्यक्रमाची आखणी करण्याची कामेही या समितीकडे दिली. या समितीचे सभासद १) सौदामिनी राव-निमंत्रक २) लीला भोसले ३) मालिनी तुळपुळे ४) प्रभा सावंत ५) छाया दातार ६) सुमन दाभोळकर ७) कुमुद पोरे ८) विद्या बाळ ९) लता भिसे १०) वसुधा सरदार–खजिनदार अशा होत्या.

प्रत्येक संघटनेचे जरी दोनच सभासद उपस्थित रहाण्याची परवानगी होती तरी सर्वजणी मिळून ३००

स्त्रिया शिबीराला उपस्थित होत्या. विविध क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांसाठी गटांगटांमधील विचारांच्या देवाणघेवाणीतून कृतीशील कार्यक्रमांची आखणी करावयाची होती. दहा चर्चासत्रे आयोजित केली होती. १) महाविद्यालयातील-शाळांमधील शिक्षिका, प्राध्यापिका २) विद्यार्थिनी ३) डॉक्टर-नर्स ४) राजकीय पक्षांचे पुढारी-नगरसेवक, आमदार, खासदार ५) कामगार संघटना प्रतिनिधी–राजकीय कार्यकर्ते ६) समाजसेवक–ग्रामीण भागात काम करणारे कार्यकर्ते ७) लेखिका, पत्रकार, संपादिका, रेडिओ व दूरदर्शनमध्ये नोकरी करणाऱ्या स्त्रिया ८) अतिशय खालच्या स्तरांमध्ये आदिवासी, शेतकरी–शेत मजूर व स्त्रियांमध्ये कार्य करणाऱ्या स्त्रिया ९) महिला संघटना प्रतिनिधी व कार्यकर्त्या १०) वकील. या चर्चासत्रांचा वृत्तांत प्रसिद्ध करण्यात आला. मुक्त चर्चासत्रातही तो वाचण्यात आला. संलग्न संस्थांनी आधीच मान्य केलेल्या समान मागण्या व स्त्रियांच्या हक्कांसाठी ८ मार्च १९७९ हा दिवस साजरा करावा असा निर्णय शिबीरात घेण्यात आला. तो अमलात आणण्यासाठी नियुक्त समितीनेच काम करावे असे ठरले. हीच समिती स्त्री मुक्ती आंदोलन संपर्क समिती म्हणून ओळखली गेली. संलग्न संस्थांकडून स्त्रीमुक्ती चळवळीत समान प्रश्नांसाठी वेळोवेळी एकत्र कार्य करण्याची अपेक्षा व्यक्त केली गेली. अशा तऱ्हेने, ११ फेब्रु. १९७९ रोजी संपर्क समितीची स्थापना झाली.

## संपर्क समितीचे स्वरूप

ज्या संघटनांचा असा विश्वास आहे की, आर्थिक, राजकीय, सामाजिक समतेचा पाया असलेला शोषणमुक्त समाज निर्माण होण्याच्या दृष्टीने घडविण्यात येणाऱ्या सर्वांगीण सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेतच स्त्रीमुक्ती प्रत्यक्षात येऊ शकेल अशा संघटनांनाच निमंत्रित करावे, असे ठरले. आपल्या कार्यक्रमांमागील किमान समान भूमिका ठरविण्यासाठी शिबीरात सहभागी झालेल्या संघटनांमध्ये चर्चा घडवून आणण्यात आली. अपेक्षित आदर्श समाजरचना, ती प्रस्थापित करण्यासाठी अवलंबिण्यात येणारे मार्ग याबाबत विविध स्त्रीसंघटनांमध्ये मतभेद आहेत, याची आम्हाला प्रथमपासूनच जाणीव होती. तरीही आमच्यामधील साम्य शोधून विशिष्ट प्रश्नांवर स्त्रीमुक्ती चळवळीत जास्तीत जास्त एकत्र कार्य करण्याचे आम्ही ठरविले. सहाजिकच त्यासाठी व्यापक, सैल आणि अनौपचारिक संघटन आवश्यक होते तरच एकजूट टिकू शकली असती. सभासद झालेल्या संघटनांना संपर्क समितीच्या एखाद्या कार्यक्रमात सहभागी व्हायचे की नाही याबाबत पूर्ण स्वातंत्र्य होते.

## सभासदत्व

कोणतीही महिला संघटना–जी संपर्क समितीच्या पायाभूत दृष्टीकोनाशी सहमत आहे ती तिचे सभासदत्व स्विकारू शकते. प्रथम फी घेतली जात नव्हती. परंतु १९८४ पासून प्रत्येक संस्थेकडून २५ रु. फी घेण्यात येऊ लागली. हे २५/- रु. सायक्लोस्टाईलचा खर्च, स्टेशनरी सामान व पोस्टेजसाठी खर्च करावे लागतात. जर एखाद्या राज्यव्यापी अथवा देशव्यापी संघटनेला समितीचे निर्णय आणि वृत्त तिच्या अनेक केंद्रांना पाठवावे असे वाटत असेल तर प्रत्येक केंद्रामागे २५ रु. समितीला द्यावे लागतात. व्यक्तींना स्वतःसाठी २५ रु. भरून सभासद होण्याची सोय उपलब्ध आहे. काही संस्था, ज्या संपर्क समितीशी जोडलेल्या होत्या त्या सोडून गेल्या (उदा. पुरोगामी स्त्री संघटना, स्त्री राखी मंडळ) व काही नवीन संस्था जोडल्या गेल्या (जशा सर्वहारा महिला आघाडी, वडगाव शेरीची महिला संघटना इ.). सध्या चाळीस संघटना संपर्क समितीच्या सभासद आहेत.

दोन प्रकारच्या संघटना आहेत– १) ज्या राजकीय पक्षाशी संबंधीत किंवा जोडलेल्या आहेत. उदा. सी. पी. एम, सी. पी. आय, लाल निशाण गट, जनता दल, भारतीय रिपब्लीकन, पक्ष, इ. २) स्वयंशासित संघटना किंवा गट–यामध्ये युवक क्रांतीदल, राष्ट्रसेवा दल, संघर्ष वाहिनी, हमाल पंचायत, श्रमिक संघटना, यांच्या महिला आघाड्याही संपर्क समितीशी संबंधित आहेत.

एकदा ट्रेड युनियनच्या संपर्क समितीच्या सभासदत्वाचा प्रश्न उपस्थित केला गेला. पुरुषांनाही कार्यक्रमात सहभागी करावे, परंतु फक्त स्त्रीसंघटनांनाच संपर्क समितीचे सभासद करावे. ज्या संस्थेमध्ये स्त्री आणि पुरुष सभासद होते त्यांना सभासदत्व नाकारण्यात यावे, असे ठरले. नंतर मिश्र संघटनातील महिलांनी स्वतःचा महिलांचा गट तयार केला व त्यांच्या प्रतिनिधी संपर्क समितीच्या कार्यक्रमात सहभाग घेऊ लागल्या. परंतु संपर्क समिती या संदर्भात स्पष्ट धोरण ठरविण्यात अपयशी ठरली.

## काम करण्याची पद्धती आणि समितीची रचना

१९७९ पासून ऑफीसाने काम करणारी सहा जणांची समिती ( निमंत्रक व खजिनदारासह ) पत्र-व्यवहार अकौंटस, कार्यक्रमांची आखणी करणे, सभांचे अहवाल तयार करणे ही कामे पहाते लोकशाही कार्य-प्रणाली आणि सामुहिक नेतृत्वाचा प्रयोग करावयाचा असल्याने निमंत्रक वा समिती या दोघांनाही कोणतेही विशेषाधिकार दिले नव्हते. संपर्क समितीत अध्यक्ष, उपाध्यक्ष असे हुद्दे नाहीत. समिती संघटनांनी वेळो-वेळी आयोजित केलेल्या बैठकांमध्ये घेतलेले निर्णय अंमलात आणण्याचे काम करते. समितीच्या बैठका बोलाविणे आणि सुसूत्रीकरण आणि अंमलबजा-णीच्या दृष्टीने बारीक सारीक निर्णय निमंत्रक घेऊ शकते. उदा. ८ मार्च च्या मागण्या ठरविण्यासाठी साधारणपणे जानेवारी किंवा फेब्रुवारीत बैठका होतात. चर्चेनंतर निर्णय घेतले जातात. हे निर्णय विविध सस्थांना कळविले जातात. त्यानंतर हे निर्णय संस्था अंमलात आणतात. समितीमध्ये विविध विचार प्रणालीचे प्रति-निधित्व करणारे सभासद आहेत. प्रत्येक संस्थेचा एक प्रतिनिधी समितीत असणे शक्य होत नाही. सोयीच्या दृष्टीकोनातून समितीचे सभासद केवळ मुंबई, पुणे येथीलच असतात. मुंबईपुण्याव्यतिरिक्त भागांना प्रतिनिधित्व देण्याच्या दृष्टीने येवल्याच्या प्रभा नारकर व विटाच्या नागमणी राव यांना समितीत घेतले. परंतु समितीच्या बैठकांसाठी त्या क्वचितच उपस्थित राहू शकल्या.

संपर्क समितीची ठराविक अशी कचेरी नाही. प्रथम ती माझ्या घरी होती आणि आता शांता रानडे यांच्या घरामध्ये आहे. बैठका विविध ठिकाणी घेतल्या जात, उदा शंकर ब्रह्मे ग्रंथालयात, समाजवादी महिला सभेच्या इमारतीत किंवा शांता रानडेंच्या घरी वगैरे– बैठकीला हजर असणाऱ्या विविध संस्थांच्या प्रतिनिधींनी बैठकीतील निर्णय त्यांच्या सभासदांपर्यंत पोचवावेत अशी अपेक्षा होती. सुरवातीला ही तोंडी संपर्क साधण्याची पद्धत उपयोगी पडे. परंतु अनेक कारणामुळे प्रतिनिधींना प्रत्येक सभा व कार्यक्रमांसाठी पाठवणे संस्थांना अवघड होऊ लागले. त्यामुळे १९८४ पासून लेखी संपर्क साधण्याची आवश्यकता भासू लागली. सातत्य टिकव-ण्यासाठी प्रत्येक संस्थेकडून तोच प्रतिनिधी पाठविण्यात यावा अशी अपेक्षा होती. परंतु संस्थांना हा नियम बंधनकारक नव्हता. संस्थेने पर्यायी प्रतिनिधींची व्यवस्था केली तरीही चालू शके. काही सभा व चर्चात्मक कार्य-क्रमांसाठी प्रत्येक संस्थेतर्फे दोन प्रतिनिधींना आमंत्रित केले जाते. एखाद्या संस्थेतर्फे दोनपेक्षा जास्त सभासद आले तरीही ते संपर्क समितीच्या कार्यक्रमांना उपस्थित राहू शकत. त्यांना आडकाठी केली जात नाही. यामुळे संपर्क समितीच्या कार्यात पुरेसा लवचिकपणा आढळतो सभेसाठी आलेल्या सभासदांतर्फे एकत्रितपणे निर्णय घेतला जातो. विशिष्ट मुद्यावर मतभेद झाले असतील तर चर्चेद्वारा मतभेद मिटवण्याचा प्रयत्न केला जातो. बहुमताने निर्णय केले जात नाहीत मतमोजणी केली जात नाही. कारण सभासदांसाठीचे प्रवेश नियम कडक व कठोर शिस्तीचे नाहीत. संघटनांनी बैठकीला प्रतिनिधी पाठविण्याबाबत, निर्णय अंमलात आणण्या-बाबत किंवा कार्यक्रमात सहभागी होण्याबाबत विविध काटेकोर नियम किंवा त्यांची कडक अंमलबजावणी केली जात नाही. अनौपचारिकपणे निर्णय घेण्याच्या प्रक्रियेविरूद्ध खालील मुद्दे मांडण्यात येत

१) काहीं संघटनांचे सभासद जास्तीच्या संख्येने उप-स्थित राहून बैठकीतील कामकाजावर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करतात.

२) काही संघटना ज्या संपर्क समितीच्या चर्चामध्ये तळमळीने सहभागी होत नाहीत किंवा गप्प रहातात– समितीच्या कार्यक्रमात मनःपूर्वक सहभागी होत नाहीत. त्यामुळे कार्यक्रम परिणामकारक होऊ शकत नाहीत

परंतु जर कडक व कठोर शिस्त पाळली असती तर संपर्क समितीचे केव्हाच विघटन झाले असते. त्या लवचि कतेशिवाय संपर्क समितीसारखी परस्पर सहकार्याने चाल-णारी संस्था उभी रहाणे अशक्य आहे. कोणत्याही विशिष्ट राजकीय पक्षाचा समितीच्या निर्णयावर जास्त प्रभाव पडू नये यासाठी आम्ही जास्तीत जास्त प्रयत्न करतो.

१९८४ मध्ये एकापेक्षा अधिक निमंत्रक नेमावे यासाठी चर्चा झाली. परंतु असे लक्षात आले की, निमंत्रकाला विशेषाधिकार नसतात. काही निमंत्रक पुण्याबाहेर गेल्यास निर्णय घेणे कठीण होईल आणि याचा संपर्क समितीच्या कार्यावरही परिणाम होईल म्हणून एकच निमंत्रक असणे योग्य आहे.

' संपर्क समितीच्या नावासंदर्भात गोंधळ होतो. तेव्हा संपर्क समिती कुणाला म्हणायचे यावर चर्चा झाली.'

१९८४ मध्ये खालील निर्णय घेण्यात आले–

१) ऑफिसमध्ये काम करणाऱ्या लहानशा समितीला कार्यकारी समिती म्हणावे.

२) प्रत्येक संघटनेच्या एका प्रतिनिधीची मिळून संपर्क समिती बनवावी (संस्थेचा आकार लक्षात घेऊ नये.).

३) सर्व संस्थांच्या सर्व सभासदांची मिळून संपर्क समितीचे व्यापक व्यासपीठ बनावे.

१९८८ मध्ये संपर्क समितीच्या पुनर्रचनेचा विचार केला गेला.

अ) निमंत्रकाऐवजी संघटक समिती स्थापन झाली. यामध्ये खालील सभासद नियुक्त केले.— १) सौदामिनी राव २) शांता रानडे ३) मालिनी तुळपुळे ४) निर्मला साठे ५) नीलम गोऱ्हे ६) साधना दधिच ७) लता भिसे ८) पुष्पा मायदेव.

सोयीकरता ऑफीस दोन वर्षे पुण्यात होते आणि सर्व सभासदही पुण्याचेच होते. नंतर लीला भोसले यांना सभासद म्हणून सामावून घेण्यात आले व लता भिसेंऐवजी अमिता देशमुख सभासद झाल्या.

या नऊ जणींची कोणी बैठक बोलवावी असा प्रश्न पडला, म्हणून असे ठरवण्यात आले की, अक्षरी क्रमाने दोन व्यक्ती ६ महिन्यासाठी निमंत्रक होतील. दर १५ दिवसांनी संघटक समितीची बैठक घेतली जाईल, अशी अपेक्षा होती.

त्यानंतर दोन वर्षांनी १९९० मध्ये ठरविले की महात्मा फुले स्मृतीशताब्दीचा मोठा कार्यक्रम पार पाडण्याच्या दृष्टीने हीच समिती तोपर्यंत कामकाज पाहील.

नंतर ज्यावेळी नवीन संघटक समिती व तिच्या ऑफीसच्या जागेसाठी सभा घेतली, तेव्हा असे लक्षात आले की पुणे मुंबई व्यतिरिक्त इतर ठिकाणचे प्रतिनिधी फारच लहान संख्येने उपस्थित होते. त्यामुळे निर्णय घेणे अडचणीचे होते. मुंबईच्या प्रतिनिधींच्या मते आहे तीच संरचना ठेवावी कारण पुणे हे मध्यवर्ती ठिकाण आहे आणि येथे बैठका घेणे सोयीस्कर पडते. पण हा विषय अजूनही चर्चेचा आहे आणि पुण्याबाहेर ऑफिस ठेवले तरीही एकूण रचना व कामाची पद्धत तीच राहील.

ब) विविध संघटना-प्रतिनिधींची कार्यकारी समिती बजवली आहे दर ३ महिन्यांनी बैठका घ्याव्या असे ठरले. प्रतिनिधींनी त्यांच्या कार्यक्रमांचा वृत्तांत द्यावा आणि संपर्क समितीच्या कार्यक्रमासंबंधी निर्णय घ्यावे अशी अपेक्षा केली जाते.

संपर्क समितीच्या शाखा नसल्याने या प्रश्नावरही एकदा चर्चा झाली. यामध्ये तिच्या शाखा नसाव्यात असा निर्णय घेतला. स्थानिक पातळीवर एकजूट घडवून आणण्यासाठी संपर्क समितीने उत्तेजन दिले. (पुणे, मुंबई, औरंगाबाद, कोल्हापूर इ. ठिकाणी) संघटनांची एकजूट अनौपचारीकरित्या स्थापन झाली आहे. या सर्व संघटनांच्या सर्व सभासदांची मिळून व्यापक स्त्री मुक्ती आ. संपर्क समिती व्हावी व तिने दर सहा महिन्यांनी भेटावे असे ठरले.

### कार्यक्रम

कार्यक्रमांसाठी संपर्क समिती परिषदा, चर्चासत्रे, प्रदर्शने, निदर्शने, निषेध, मोर्चे, धरणे, सांस्कृतिक कार्यक्रम, विरोधी पत्रके (निषेध) इ. त्रिविध पद्धतींचा वापर करते.

१) ८ मार्च—समान मागण्यांसाठी एकत्रितरित्या पुणे, मुंबई, कोल्हापूर, सांगली, अहमदनगर, भोर, श्रीरामपूर इ येथे ८ मार्च १९७९ साजरा केला. तेव्हापासून दरवर्षी विविध संस्थांचे प्रतिनिधी जानेवारी किंवा फेब्रुवारीत भेटून ८ मार्चला कोणत्या मागण्या प्रामुख्याने मांडायच्या ते ठरवतात. अशाप्रकारे ८ मार्च साजरा करण्याची आता परंपराच झाली आहे. काही संस्थांना त्यांचे काही वेगळे कार्यक्रम करायचे असतील तर ७ किंवा ९ मार्चला किंवा नियोजित कार्यक्रमांच्या वेळेऐवजी दुसऱ्या वेळेला ठेवले जातात. संपर्क समितीच्या प्रयत्नांमुळे ८ मार्च महाराष्ट्रात चांगलाच परिचित झाला आहे. आता सरकारी अधिकारी आणि भाजप महिला आघाडीही ८ मार्च साजरा करतात. ८ मार्चच्या दिवशी तत्कालीन प्रश्नांवर आधारित विविध मागण्यांना महत्व देण्यात येते उदा. ८ मार्च १९८० ला मथुरा बलात्कार केस पुन्हा चालू करण्याची मागणी केली गेली. मथुरा ही एक शेतमजूर महिला होती व तिच्यावर चंद्रपूर जिल्ह्यात पोलीस स्टेशनमध्ये पोलीसानेच बलात्कार केला. यासाठी विरोधी सभा, मोर्चे, निषेध, सह्यांची मोहीम इ. कार्यक्रम ठरवले होते. बऱ्याच वेळा आखणी ठरवल्या जातात. परंतु कार्यक्रमांची आखणी करण्याचे स्वातंत्र्य त्या त्या संघटनेला असते. स्थानिक परीस्थितीन्वये व सोयींप्रमाणे संस्था कार्यक्रमाची निवड

करू शकतात. ग्रामीण भागात संपर्क समितीचा विस्तार वाढवण्यासाठी ८ मार्च १९८८ मध्ये फलटणमध्ये चर्चा ठेवण्यात आली. या वर्षी फलटणमधील जवळ जवळ १०० महिला उपस्थित होत्या. परंतू फलटणबाहेरील इतर संघटनांना प्रतिसाद कमीच होता.

८ मार्चच्या विविध वर्षांच्या कार्यक्रमातही खालील मागण्यांवर जोर देण्यात आला.

१) १९७९ स्त्रियांना रोजगार

२) स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराबाबत तातडीने निर्णय घेण्यासाठी **महिला कार्यकर्त्या व समाज सेविका यांचा आयोग**. बालवाड्या, पाणीपुरवठा, आरोग्य विषयक व्यवस्था, आंतरराष्ट्रीय शांतता, स्त्रीसंरक्षण, स्वच्छ व पुरेसे रेशन. (१९८१) विचार व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य (१९८३) लिंग परीक्षा बंदी; दूरदर्शन व रेडिओमुळे पसरलेला हिंसाचार, अत्याचार, अंध विश्वास; समान नागरी कायदे, प्रत्येक जिल्हयात महिला पोलीस कक्ष (१९८५) महिलांकरता वसतीगृहे, कुटुंब-न्यायालये इ. इतर काही मागण्याही वेळोवेळी मांडल्या गेल्या.

३) बऱ्याचदा ८ मार्चच्या मागण्या वादविवादामधून सुचतात. अनेक विषयावर वादविवाद, चर्चा होतात. उदा नवीन शैक्षणिक धोरण, पुणे येथील लॉ कॉलेज-मधील प्राध्यापिकांनी तयार केलेला नवीन समान नागरी कायद्याचा मसुदा, आदिवासी जमातीसाठी कायदे व त्यांच्याकरता हिंदू कायदे लागू करावे. परित्यक्तांच्या समस्या, अल्पवयीन मुलींवरील अत्याचार, स्त्री व राजकारण, स्त्रीयांकरता ३० टक्के राखीव जागा इ. वर चर्चा झाल्या. संपर्क समितीच्या स्वरूपाबद्दल, भूमिकेबद्दलच्या अपेक्षा व सूचना, अनेक संघटनांच्या कार्यक्रमांचे वृत्तांत-- विशेष करून संपर्क समितीच्या कार्यक्रमासंबंधी काही चर्चासत्रे होतात महिला चळवळीची दिशा आणि कार्य याबर चर्चा झाली. विविध संघटना प्रतिनिधींकडून अनेक पेपर वाचले गेले. संघटनांमधील समान आणि वेगळया दृष्टीकोनांना समजून घेणे हा याचा हेतू होता. १९८६ साली मुंबईमध्ये झालेल्या धरणे कार्यक्रमावर ही मूल्यमापनात्मक चर्चा झाली.

संपर्क समितीने अनक परिषदा घेतल्या १९८३ मधील १२ व १३ नोव्हेंबरला ५०० महिलांची औरंगाबाद येथे परिषद भरली होती. यासाठी औरंगाबाद येथील स्त्री अत्याचार विरोधी परिषदेने पुढाकार घेतला होता. त्यामुळे औरंगाबादमध्ये स्त्री मुक्ती चळवळीला चालना मिळाली चार चर्चासत्रे व एक सर्व म[...]ांची सभा हे त्याचे विशेष होते. अहिल्या रांगणेकर [...]ाल गोरे, प्रमिला दंडवते या कार्यक्रमांना उपस्थित होत्या. महात्मा फुल्यांच्या १०० व्या पुण्यतिथीनिमित्त २८ नोव्हेंबर १९९० मध्ये पुण्यात एक परिषद झाली. यावेळी महिलांच्या प्रमुख मागण्यांचा मसुदा प्रसिद्ध करण्यात आला जवळजवळ चार हजार स्त्री पुरुष याला उपस्थित होते.

ज्या ठिकाणी बाबासाहेबांनी स्त्रियांच्या व पददलित स्त्रीच्या समान हक्कांकरता मनुस्मृती जाळली, त्या महाडमध्ये २७ एप्रिल १९९१ ला एक परिषद भरवण्यात आली होती. महाडला येणे वाहतूक व दळणवळणाच्या दृष्टीने अडचणीचे होते तरीही हजारावर स्त्रिया आल्या होत्या. (महाड हा कोकणातील एक डोंगराळ भाग आहे.) अंधश्रद्धा, परंपरा तसेच धर्मांधता व जातीयतेविरुद्ध पुणे, नासिक, ठाणे, आंबेजोगाई येथे परिषदा झाल्या.

४) २१ मार्च १९८६ मध्ये विधानसभेपुढे मोठ्या प्रमाणावर केलेले धरणे ही संपर्क समितीने केलेली मोठी कामगिरी म्हणावी लागेल कार्यक्रमाची अंमलबजावणी व व्यवस्था करण्याची जबाबदारी मुंबईच्या संघटनांनी घेतली होती. महाराष्ट्रातील विविध भागातील चार ते पाच हजार महिला आल्या जमल्या होत्या. महिलांच्या मागण्यांचे निवेदन पत्रक मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्या हाती दिले व या मागण्यासंदर्भात त्यांच्याबरोबर चर्चाही केली.

५) विशिष्ट प्रश्नांना महत्व देण्यासाठी संपर्क समिती विशिष्ट दिवस जाहीर करते. सर्व संस्था या ठरवलेल्या प्रश्नावर आधारीत कार्यक्रम करून तो दिवस साजरा करतात. ८ ऑगस्ट १९८० हा दिवस महिला अत्याचाराविरूद्ध जाहीर केला. परित्यक्ता महिलांच्या प्रश्नावर भर देण्यासाठी २३ एप्रिल १९९० हा दिवस (रमाबाईंच्या जन्मदिनाच्या दिवशी) ठरविण्यात आला.

६) संबंधित उच्च अधिकाऱ्यांचे स्त्रियांवरील अत्याचारांकडे लक्ष जावे यासाठी संपर्क समितीतर्फे निषेध पत्रे पाठवली जातात. उदा मथुरा बलात्कार प्रकरणी इंदिरा गांधींना पत्र पाठवले गेले

प्रमुख न्यायाधीश चंद्रचुड यांना त्यांच्या महिला लेखनिकांनी कोर्टामध्ये साडीतच यावे, या सूचनेविरूद्ध पत्र पाठवले.

सूचना व माहिती प्रसारण मंत्री अजित पांजा यांना मुंबई दूरदर्शनवरील स्वामी मालिकेत रमाबाईंचा सति

जाण्याचा प्रसंग दाखविण्यास परवानगी देऊ नये, यासाठी पत्र पाठवले.

७) १९८८ मध्ये संपर्क समितीतील ८ सभासदांनी चंद्रपूर जिल्ह्याला भेट दिली. या ठिकाणी झालेल्या दलित स्त्रियांवरील अत्याचारांवर नीलम गोऱ्हे व निर्मला साठे यांनी पुस्तिका तयार केली.

फुल्यांच्या पुण्यतिथिच्या आधी पाच दिवस सावित्रीबाई फुल्यांच्या नायगाव या जन्मठिकाणापासून पुण्यापर्यंत ठरवलेला पदयात्रेचा कार्यक्रम होऊ शकला नाही, हे आमचे अपयश आम्ही मान्य करतो.

## अर्थविषयक--

आम्हाला कोणत्याही प्रकारच्या संस्थेची आर्थिक मदत किंवा परदेशी मदत मिळत नाही. जेव्हा जेव्हा गरज भासते तेव्हा विविध कार्यक्रमांसाठी आमच्या सभासदांकडून पैसा उभा करतो. हा गोळा केलेला पैसा कमी पडत असल्याने आम्ही प्रतिनिधींसाठी स्वस्त खाण्याची व रहाण्याची सोय करू शकतो जेव्हा पुण्यामध्ये बैठकी होतात त्यावेळी पुण्यामधील संघटनांचे प्रतिनिधी बाहेरगावच्या प्रतिनिधींची रहाण्याची व खाण्याची सोय करतात (पैसा गोळा करून) बोलावलेल्या पाहुण्यांना प्रवासाचे भाडे दिले जात नाही. साधारणपणे आमच्या कार्यक्रमांसाठी आम्ही पैसा उभा करतो. परंतु काही अपवाद आहेत. आदिवासी जमातीचे कायदे या विषयावर झालेल्या चर्चासत्रासाठी (मुंबईच्या) चेंबुर येथील T. I.S S.R.ने पैसा पुरवला. त्याचप्रमाणे केशव गोरे स्मारक ट्रस्ट येथे झालेल्या 'स्त्रिया आणि राजकारण' या चर्चासत्राच्या कार्यक्रमासाठी स्त्रियांचे अभ्यास केंद्र (S N. D. T. विद्यापीठ, मुंबई) यांनी आर्थिक मदत केली. मोठ्या परिषदेकरता लहानसहान देणग्या गोळा केल्या जातात. संपर्क समितीला निधी मिळवून देण्यासाठी मुंबईच्या स्त्रीमुक्ती संघटनेने 'मुलगी झाली हो' या नाटकाचा प्रयोग केला, याची दखलही घेतलीच पाहिजे या प्रयोगामुळे साडेतीन हजार रु संपर्क समितीसाठी मिळू शकले.

## अडचणी आणि मर्यादा

हळूहळू प्रतिनिधींची सभाबैठकींसाठीची उपस्थिती कमी होत आहे, असे लक्षात आले चर्चासत्राचे कार्यक्रम आणि परिषदांना साधारणपणे चांगली उपस्थिती असे. परंतु कार्यकारी समितीच्या सभांकरिता जेमतेम उपस्थिती असते. याची खालील कारणे असू शकतील.

अ) संपर्क समितीच्या संयोजनातील काही त्रुटी

ब) पोस्टाच्या अकार्यक्षमतेमुळे पत्रे वेळेवर न मिळणे, किंवा न मिळणे.

क) वाढलेले प्रवासी--भाडे. यामुळे मराठवाडा व विदर्भ येथून वारंवार पुण्याला येणे अतिशय कठीण होत चालले आहे.

ड) सभेच्या गैरसोयीच्या तारखा.

इ) काही संस्थांच्या कार्यक्रमांची किंवा काही महत्त्वाच्या कार्यक्रमांची आणि बैठकीची एकच वेळ असणे.

फ) चळवळीची व्याप्ती वाढल्याने पूर्वी संपर्क समितीवर अवलंबून असणाऱ्या अनेक संघटना स्वतंत्रपणे व्यवस्थित कार्य करू शकतात. त्यांना संपर्क समितीच्या पाठिंब्याची गरज वाटत नाही. परंतु त्या अजून संपर्क समिती सोडुन गेल्या नाहीत.

संघटनांमधील मतभेद

ज) भोवतालची बिघडलेली परिस्थिती--(राजकीय, आर्थिक, सामाजिक) शांतता, संरक्षण व स्थैर्याचा अभाव, वाढता हिंसाचार, मूलतत्वाचा वाढता धोका इ.

१) या सर्वांमुळे स्त्रियांचे प्रश्न दुय्यम स्वरूपाचे ठरतात साहजिकच कार्यकर्ते निराश होतात. त्यांनी जरी काही प्रश्न आणि कार्यक्रम घेतले तरी लोकांच्या प्रतिसादावर किंवा त्यांच्या स्वतःच्या कार्यक्रमावर त्या समाधानी नसतात. उदा. कोल्हापूर येथील कॉर्पोरेशनमध्ये ३० टक्के राखीव जागांबाबत संपर्क समितीमध्ये समझोता करून निरनिराळ्या संघटनांना आपापसातील मारामारी टाळण्याचा प्रयत्न केला. त्यांना जरी बऱ्यापैकी मते पडली तरीही त्या एखादीही जागा जिंकू शकल्या नाहीत. यावरून आम्हाला कल्पना आली की, परंपरावादी गट किती वाढत्या प्रमाणात आमच्याविरुद्ध परिणामकारक कार्य करीत आहेत. असे अनुभव कार्यकर्त्यांना नाऊमेद करतात.

२) संपर्क समितीचे महत्त्व आणि आवश्यकतेची जाणीव असली तरी देखील अनेक संघटना तिच्या बैठका, सभा आणि इतर कार्यक्रमास नियमितपणे हजर रहात नाहीत. समजा, एखादी विशिष्ट सभा किंवा कार्यक्रम पुढे ढकलले गेले तर त्याला हजर असणाऱ्या प्रतिनिधींच्या वेळेचा, पैशाचा आणि शक्तीचा अपव्यय होतो. यासारख्या गोष्टीमुळेही सभासद नाराज होतात.

३) मर्यादित पैसा, वेळ आणि शक्ती. काही वेळा त्यांना स्वतःच्या संघटनेचे काम आणि संपर्क समितीचे काम ह्या दोहोंपैकी एक निवडावे लागते. विशेषतः जेव्हा

दोन्हींच्या कार्यक्रमांची वेळ एकच असेल तर सभासद त्यांच्या संघटनेच्या कार्यक्रमाला प्राधान्य देतात. हे स्वाभाविकच आहे. परंतु यामुळे संपर्क समितीच्या कामावर परिणाम होतो. महिला चळवळींच्या विस्ताराबरोबरच विविध संघटनांमध्ये स्पर्धा निर्माण झाल्यासारखी दिसते. या संघटना स्वतःच्या संस्थेचे जास्तीत जास्त कार्यक्रम करून समाजाच्या नजरेसमोर प्रकाशात येण्यासाठी प्रयत्न करतात. त्यामुळे संपर्क समितीचे कार्यक्रम आणि इतर संघटनांचे कार्यक्रम यामध्ये विरोध निर्माण होण्याचे प्रसंग वाढले आहेत. ह्यामुळे संपर्क समितीच्या कार्यावर परिणाम होतो.

४) व्यक्तींमधील आणि संघटनेअंतर्गत मतभेद, सभासदांमधील सुयोग्य संवादाचा अभाव, व्यक्तीगत तक्रारी सोडवण्याबाबत संपर्क समितीची असमर्थता या कारणामुळे सभासदांमध्ये गैरसमज होतात व याचा परिणाम संपर्क समितीला सतत सहन करावा लागतो. विशेषतः राजकीय पक्ष, संघटना आणि स्वयंशासित गट आणि संघटना यांच्यामध्ये अशा प्रकारचे गैरसमज उत्पन्न होतात. अनेकवेळा ते एकमेकांबद्दल नाखुषी व्यक्त करतात. बऱ्याच वेळा स्वयंशासित गटाची अशी तक्रार असते की, राजकीय पक्षांच्या मोठ्या शक्तीमुळे ते संपर्क समितीचे निर्णय आणि कार्यक्रम यावर प्रभाव पाडतात आणि त्यांच्या राजकीय हेतूसाठी लहान गटांचा उपयोग करून घेतात. राजकीय पक्ष संघटनांना वाटते की कमी ताकद असूनसुद्धा या स्वयंशासित संघटना बऱ्याच मोठ्या संघटनांच्या बरोबरीने प्रतिनिधींची मागणी करतात आणि संपर्क समितीच्या कामावर प्रभाव पाडू इच्छितात काही मर्यादेपर्यंत हे फरक कमी झाले आहेत. उदा. आंतरराष्ट्रीय शांतता, रोजगाराचा प्रश्न यावर पूर्वी स्फोटक चर्चा होत परंतु स्वयंशासित गट आता या प्रश्नांना मान्यता देतात. दुसऱ्या बाजूला स्त्रियांचे प्रश्नांना-परित्यक्तांच्या समस्या, लिंगनिदान परीक्षा, पोटगी इ. प्रश्नांना राजकीय पक्ष संघटनांकडून अधिक महत्व दिले जाते. तरीही त्यांच्यातील मतभेद, एकमेकांबद्दल आक्षेप संपूर्णपणे संपले आहेत असे म्हणता येणार नाही

५) संपर्क समितीच्या अखत्यारीबाहेरच्या घटकांमुळे किंवा नकळत झालेल्या चुकांमुळेसुद्धा खूप गैरसमज होतात. उदा. पत्रकामध्ये एखाद्या व्यक्तीचे वा संघटनेचे नाव घालायचे राहून जाणे, किंवा शेवटी नाव देणे किंवा वर्तमानपत्रात नाव न येणे, टपालसेवेच्या अकार्यक्षमतेमुळे वेळेवर निमंत्रणे न पोचणे किंवा निमंत्रणेच न मिळणे; या सर्व गोष्टींमुळे सभासद नाराज होतात. त्यांना वाटते की, कोणीतरी मुद्दामच तसे केले. अनेक अनुभवानंतर याबाबत अधिक दक्ष रहाण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत.

६) जरी सभासद संघटना निर्णय अंमलात आणतात किंवा कार्यक्रम घेतात तरी अनेक वेळा विनंती करूनसुद्धा संपर्क समितीकडे त्या लेखी अहवाल पाठवत नाहीत घाईगर्दीत त्यासाठी त्यांना उसंत मिळत नाही. अनेकवेळा, घेतलेल्या कार्यक्रमाची लेखी नोंद असण्याचे महत्व त्यांना पटलेले नसते.

७) महाराष्ट्राच्या प्रत्येक कान्याकोपऱ्यात संपर्क समितीचे काम पोचले असे म्हणता येणार नाही. साधारणपणे ज्या संघटना आपणहून आमच्याकडे सभासद होण्यासाठी आल्या त्यांना आम्ही सामावून घेतले. अधिक भागामध्ये किंवा संघटनांपर्यंत काम वाढविण्याचा प्रयत्न संपर्क समितीने फारसा केला नाही. अलिकडेच महाडमध्ये परिषद घेतली नाहीतर तोपर्यंत कोकण भागात संपर्क समितीचे काम जवळजवळ नव्हतेच. नुकतेच संपर्क समितीच्या कामाविषयी आणि वैचारिक दृष्टिकोनाविषयी एक पत्र तयार केले आहे. आणि त्याच्या आधारावर नवीन संघटनांना समितीचे सभासद होण्यास आवाहन करण्यात येत आहे. महाराष्ट्रातील निरनिराळ्या विभागात संघटक समितीच्या सभासदांनी भेटी देऊन संपर्क समितीचे काम वाढविण्याची शक्यता पडताळून पहाण्याची योजना आखली जाणार आहे.

८) शिस्तीचा प्रश्न पण महत्वाचा आहे संपर्क समिती सर्व सभासद संघटनांची आहे. सर्वांना समान स्थान आहे. तेव्हा वरून शिस्त राखण्यासाठी कोणतीही अधिकारी सत्ता नाही. संघटनांनी स्वतःच स्वतःवर लादलेली शिस्त राखली पाहिजे. (selfimposed) कारण त्यांनीच सर्व निर्णय घेतलेले असतात. हे निर्णय अंमलात आणणे हे त्यांचे नैतिक कर्तव्य आहे परंतु अनेक वेळा काही संघटना (ठराविक नाही) संपर्क समितीच्या कार्यक्रमात मनःपूर्वक सामील होत नाहीत किंवा समितीच्या बैठकांना, सभांना नियमितपणे प्रतिनिधी हजर करत नाहीत किंवा नियमित फी भरत नाहीत. त्यांच्याविरूद्ध काहीही कारवाई करता येत

नाही. सक्तीचा वापर केल्यास संपर्क समितीत फूट पडू शकेल.

९) काही संघटना संपर्क समितीचा वापर त्यांच्या सोयीनुसार किंवा अग्रक्रमानुसार करतात. काही वेळा त्या एकजुटीच्या व्यासपीठाचा त्यांच्या फायद्यासाठी वापर करतात. तर इतर वेळी संपर्क समितीची दखलही घेत नाहीत. काही व्यक्तींनी स्वतःच्या किंवा संघटनेच्या नेतृत्वाच्या वाढीसाठी संपर्कसमितीचा वापर केला तर इतर संघटना नाराज होतात, रागवतात. त्याचा संपर्क समितीच्या कामावर अनिष्ट परिणाम होण्याचा संभव आहे.

१०) सभासद संघटनांमध्ये मते आणि विचारांमध्ये फरक आहेत हे उघड गुपित आहे. सहाजिकच त्यांच्यामध्ये एकमेकांबद्दल काही तक्रारी, गैरसमज, किंतु असणे शक्य आहे. परंतु जोपर्यंत सभासद संघटनांना एकजुटीच्या व्यासपीठाची गरज मान्य आहे, तोपर्यंत त्यांनी मुक्त चर्चा करून ते दूर केले पाहिजेत. उघड टीका आणि प्रामाणिक स्वयंमूल्यमापन आणि वेळोवेळी संपर्क समितीच्या कामाचे मूल्यमापन याबाबतीत मदतकारक होईल. बाहेरील संघटनांकडे किंवा वर्तमानपत्रे आणि नियतकालिकांकडे त्यासाठी धाव घेणे हे संपर्क समितीच्या कामाला हानिकारक आहेच; परंतु त्याचबरोबर समाजातील स्त्रियांच्या चळवळीची असलेली प्रतिमा डागाळली जाते. अनेक वेळा संपर्क समितीला या प्रकारची हानी पत्करावी लागलेली आहे. अशा पद्धतीने वागणाऱ्या सभासदांना तात्पुरते समाधान मिळते. परंतु दूरदृष्टीने पहाता त्यांच्या प्रतिमा आणि कामाची हानीच होते. संपर्क समिती ही कोणा एका व्यक्तीची वा संघटनेची मक्तेदारी नाही. ती तशी नसावी, म्हणून सर्व संघटनांनी तिच्या कार्यात पूर्णपणे आणि प्रामाणिकपणे सहभागी झाले पाहिजे. तरच ती लोकशाही पद्धतीने कार्य करू शकेल. अलग रहाणे हा त्यावरचा उपाय नव्हे.

१०) संपर्क समितीचे बहुतेक कार्यक्रम औपचारिक आणि लाक्षणिक असतात. मुख्यतः स्त्रियांवरील हक्क याबाबत स्त्रियांमध्ये आणि समाजात जाणीव निर्माण करण्याचे काम त्यांनी केले आहे. समाजव्यवस्थेत मूलभूत बदल घडवून आणण्याच्या दृष्टीने फारसे काही करता आलेले नाही. जेल भरोसारखे कार्यक्रम घेणेही शक्य झालेले नाही. संपर्क समितीचे स्वरूप लक्षात घेता नजिकच्या काळात ते तिच्या आवाक्यातील आहे असे मला वाटत नाही.

११) मूलतत्त्ववाद आणि जातियवाद झपाट्याने पसरत आहेत. हिंसाचार आणि गुंडगिरी यांचा राजकारणात प्रादुर्भाव झालाय. शिवसेना आणि भा. ज. पा. अधिकाधिक आक्रमक बनत आहेत. अशा परिस्थितीत स्त्रियांना राजकारणात अगर सर्वांगीण सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यात सहभागी होणे अधिकाधिक अवघड बनतंय. मध्यकाळाच्या परिस्थितीत तर आपल्याला परत ढकलले जाणार नाही ना, अशी शंका स्त्रियांच्या मनात डोकावत आहे. म. फुले, गोपाळ गणेश आगरकर म. गांधी, बाबासाहेब आंबेडकर आणि इतर सुधारकांचे प्रयत्न फुकट जाणार का ? पुरोगामी शक्तींच्या एकजुटीची कधी नव्हे एवढी गरज निर्माण झाली आहे. तत्वतः कदाचित सर्वांना हे मान्य होईल. परंतु प्रत्यक्षात एकत्र येणे, एकजूट करणे अधिकाधिक अवघड होत आहे.

संपर्क समितीचे यश मर्यादित आहे, ह्याची आम्हाला जाणीव आहे. तिच्या भवितव्याबद्दल आम्ही साशंक आहोत. संपर्क समितीचा अनुभव हा महाराष्ट्रापुरता मर्यादित आहे. तरीही निरनिराळ्या संघटनांना एकत्र आणताना अनेक व्यावहारिक अडचणी येत आहेत. भारत हा मोठा विस्तार असलेला देश आहे. संपर्क समितीसारखा प्रयोग राष्ट्रीय पातळीवर करायचा झाल्यास संपर्क ठेवणे, निर्णय घेणे, निर्णय कळविणे व अंमलात आणणे, कार्यक्रम ठरविणे, कार्यक्रमाचे सुत्रीकरण करणे इत्यादीबाबत अडचणी निर्माण होण्याचा संभव आहे. टपाल, टेलिफोन आणि वाहतूक दरातील अतिप्रमाणातील वाढ ह्या महत्त्वाच्या व्यावहारिक अडचणी आहेत. परंतु इच्छा असेल तर मार्ग निघतो. तेव्हा आपण आशा करू या की स्वातंत्र्य आणि न्याय मिळविण्यासाठी एकजुटीच्या प्रयत्नांना उज्वल भविष्यकाळ लाभेल.

(सी. एस्. आर्., नवी दिल्ली या संस्थेने डिसेंबर १९९१ मध्ये दिल्लीला, घेतलेल्या 'स्त्रियांचे प्रतिनिधित्व' या विषयावर घेतलेल्या राऊंड टेबल चर्चेमध्ये वाचलेला निबंध.)